2 5 JAN 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विजयसिंह यादव महाविद्यालयात 'नॅक न्यू मॅट्रिक्स'वर कार्यशाळा

## महाविद्यालयांची शैक्षणिक व प्रशासकीय तयारी कशी करावी याबाबत केले मार्गदर्शन

**जनप्रवास : पेठ वडगाव**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या परिस स्पर्श योजनेअंतर्गत श्री विजयसिंह यादव महाविद्यालय, पेठ वडगाव येथे 'नॅक न्यू मॅट्रिक्स' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडली. उच्च शिक्षण संस्थांसाठी नॅक मूल्यांकन प्रक्रियेत झालेले बदल, नव्या मॅट्रिक्सची रचना आणि त्यानुसार महाविद्यालयांची शैक्षणिक व प्रशासकीय तयारी कशी करावी, याबाबत मार्गदर्शन करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.



**पेठ वडगाव : येथे कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. नीलेश पवार. व्यासपीठावर इतर मान्यवर.**

कार्यशाळेच्या उद्‌घाटन समारंभात न्यू कॉलेज, कोल्हापूरचे नॅक समन्वयक डॉ. नीलेश पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अशोक चव्हाण होते. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. अमर पोवार यांनी केली तर प्रमुख पाहुण्यांची ओळख व परिचय डॉ. सचिन पवार यांनी करून दिला.

उद्‌घाटनपर भाषणात डॉ. नीलेश पवार यांनी नॅकच्या नवीन मॅट्रिक्समुळे महाविद्यालयांच्या कार्यपद्धतीत गुणवत्ता, नियोजन आणि पारदर्शकता यांना अधिक महत्त्व प्राप्त झाल्याचे सांगितले. संस्थात्मक पातळीवर सातत्याने सुधारणा केल्यास नॅक मानांकन अधिक परिणामकारक ठरते, असे त्यांनी स्पष्ट केले.

पहिल्या सत्रात उच्च शिक्षणातील शाश्वत गुणवत्ता उत्कृष्टता या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. या सत्रात अध्यापन प्रक्रिया अधिक परिणामकारक कशी करता येईल, विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांची भूमिका आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे महत्त्व यावर सविस्तर विचार मांडण्यात आले.

दुसऱ्या सत्रात कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा येथील संशोधन व विकास विभागाचे डीन डॉ. सर्फराज मुजावर यांनी नॅक प्रक्रियेत संशोधन व विकासाचे स्थान स्पष्ट केले. संशोधन प्रकल्प, शोधनिबंध, नवकल्पना आणि त्यांचा थेट परिणाम नॅक गुणांकनावर कसा होतो, हे त्यांनी सोप्या शब्दात मांडले.

तिसऱ्या सत्रात यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेसचे उपप्राचार्य डॉ. जयकुमार चव्हाण यांनी नवीन एमबीजीएल मानांकन पद्धतीतील इनपुट, प्रक्रिया आणि परिणाम मॅट्रिक्स यांची माहिती दिली. माहिती संकलन, पुरावे सादर करणे आणि दैनंदिन कामकाजात मॅट्रिक्सचा उपयोग कसा करायचा, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. दिनेश भंडारी, डॉ अर्जुन कोकरे, प्रा. अविनाश लाडगावकर, प्रा. साहिल मुजावर, डॉ. प्रशांत यादव, प्रा. प्रशांत गायकवाड, प्रा. नाझिम शेख, डॉ. रेणुका पवार यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे सदस्य उपस्थित होते.

२ 5 JAN 2026

सकाळ




कोल्हापूर : पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविणारा शिवाजी विद्यापीठाच्या इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचा संघ.

# अन्वेषण संशोधन स्पर्धेत विद्यापीठाचा इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी संघ प्रथम

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २४ : पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. गुजरातमधील सरदार पटेल विद्यापीठात ही स्पर्धा झाली. स्पर्धेत सहा संशोधन शाखांमध्ये विद्यापीठातून २३ जणांचा संघ सहभागी झाला होता.

संघात शुभम तानाजी गिरीगोसावी, तेजस दिलीप यादव, नीलेश सदानंद सूर्यवंशी, स्वप्नाली मगदूम यांचा समावेश होता. प्राणीशास्त्र अधिविभागातील डॉ. एम. पी. भिलावे, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटच्या डॉ. श्रीमती कविता वड्राळे, भारती विद्यापीठातील प्रा. प्रणाली टकले यांचे मार्गदर्शन मिळाले. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. जे. पी. जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. टी. एम. चौगले, डॉ. पी. के. पवार यांचे प्रोत्साहन लाभले.

25 JAN 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात 'भारतीय विद्येचा परिचय' अभ्यासक्रम उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात 'भारतीय विद्येचा परिचय' हा पाच दिवसांचा बहुविद्याशाखीय मूल्यवर्धित अभ्यासक्रम नुकताच उत्साहात पार पडला. विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रामध्ये पीएम-उषा योजनेंतर्गत या अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'भारतीय विद्येचा परिचय' या मूल्यवर्धित अभ्यासक्रमास सहभागी झालेले विद्यार्थी. सोबत मान्यवर.

या अभ्यासक्रमामध्ये तज्ज्ञांनी भारतीय विद्या, पुरातत्त्वशास्त्र आणि स्थानिक इतिहासाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. यामध्ये सोनाली शाह यांनी भारतीय विद्येचा उगम आणि जागतिक इतिहास मांडला, तर डॉ. योगेश प्रभुदेसाई यांनी पुरातत्त्वशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करत ब्रम्हपुरी येथील उत्खनन, करवीरमाहात्म्य संस्कृत ग्रंथ आणि प्राचीन ताम्रपटांच्या वाचनाद्वारे भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवले. डॉ. तन्मय भोळे यांनी संस्कृत व प्राकृतमधील प्राचीन ग्रंथ संपदेचे महत्त्व विशद केले, तर योगिनी आत्रेय यांनी ब्राह्मी ते देवनागरी या लिपी प्रवासाचा मागोवा घेत विद्यार्थ्यांना ब्राह्मी लिपीचे प्राथमिक धडे दिले. डॉ. हर्षदा विरकूड यांनी विरगळींकडे पाहण्याचा नवा सांस्कृतिक व पुरातत्त्वीय दृष्टिकोन मांडला. मानसिंग चव्हाण यांनी भारतीय अध्ययन पद्धतीतून मध्ययुगीन ते आधुनिक भारतीय विद्येचा वारसा जपणाऱ्या कोल्हापूरच्या इतिहासाचे सखोल विश्लेषण सादर केले.

या अभ्यासक्रमाच्या समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अभ्यासक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप, इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. दत्तात्रय मचाले, डॉ. उमाकांत हत्तीकट यांनी परिश्रम घेतले. त्यास अध्ययन केंद्रातील सर्व सहकाऱ्यांनी सहकार्य केले.

25 JAN 2026 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'भारतीय विद्येचा परिचय' मूल्यवर्धित अभ्यासक्रमाचे आयोजन



कोल्हापूर : 'भारतीय विद्येचा परिचय' बहुविद्याशाखीय मूल्यवर्धित अभ्यासक्रमात सहभागी विद्यार्थी.

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रामध्ये पीएम-उषा योजनेंतर्गत 'भारतीय विद्येचा परिचय' हा पाचदिवसीय बहुविद्याशाखीय मूल्यवर्धित अभ्यासक्रम झाला.

यावेळी सोनाली शाह यांनी भारतीय विद्येचा उगम व तिचा जागतिक संदर्भ उलगडून सांगितला. डॉ. योगेश प्रभुदेसाई यांनी पुरातत्त्व शास्त्राची व्याप्ती स्पष्ट करत ब्रह्मपुरी येथील उत्खनन, करवीरमाहात्म्य या संस्कृत ग्रंथाचा अभ्यास व प्राचीन ताम्रपटांच्या वाचनातून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवले. डॉ. तन्मय भोळे यांनी संस्कृत व प्राकृत भाषांमधील प्राचीन ग्रंथसंपदेचे महत्त्व विशद केले. योगिनी आत्रेय यांनी ब्राह्मीपासून देवनागरीपर्यंतच्या लिपीप्रवासाचा मागोवा घेत विद्यार्थ्यांना ब्राह्मी लिपीचे प्राथमिक धडे दिले.

डॉ. हर्षदा विरकुड यांनी विरगळांकडे पाहण्याचा नवा सांस्कृतिक व पुरातत्त्वीय दृष्टिकोन मांडला, तर मानसिंग चव्हाण यांनी भारतीय अध्ययन पद्धतीच्या आधारे मध्ययुगीन ते आधुनिक काळातील कोल्हापूरच्या इतिहासाचे सखोल विश्लेषण केले. समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. अवनीश पाटील, डॉ. दत्तात्रय मचाले व डॉ. उमाकांत हत्तीकट यांनी विशेष परिश्रम घेतले.

2 5 JAN 2026 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात भारतीय विद्येचा परिचय अभ्यासक्रमास प्रतिसाद

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रामध्ये पीएम-उषा योजने अंतर्गत 'भारतीय विद्येचा परिचय' हा १९ ते २३ जानेवारी या पाच दिवसांचा बहुविद्याशाखीय मूल्यवर्धित अभ्यासक्रम नुकताच उत्साहात झाला. यास विद्यार्थी, संशोधकांचा प्रतिसाद लाभला.

सोनाली शाह यांनी भारतीय विद्येचा, उगम व जागतिक इतिहास मांडला. डॉ. योगेश प्रभुदेसाई यांनी ब्रह्मपुरी येथील उत्खनन, करवीर माहात्म्य संस्कृत ग्रंथ आणि प्राचीन ताम्रपटांच्या वाचनाद्वारे भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवले. डॉ. तन्मय भोळे यांनी संस्कृत व प्राकृतमधील प्राचीन ग्रंथ संपदेचे महत्त्व विशद केले. डॉ. हर्षदा विरकुड यांनी वीरगळींकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन मांडला. मानसिंग चव्हाण यांनी भारतीय अध्ययन पद्धतीतून उलगडला. समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप, इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. दत्तात्रय मचाले, डॉ. उमाकांत हत्तीकट यांनी परिश्रम घेतले.

महा न्यूज व्ह्यूज

Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# परिपूर्ण आणि जबाबदार नेतृत्व विकसित होणे गरजेचे: डॉ. विलास शिंदे

## शिवाजी विद्यापीठाच्या नेतृत्व विकास शिबिराचा समारोप

**कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, सेंटर फॉर लीडरशिप डेव्हलपमेंट आणि बहाई अकॅडमी, पाचगणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाच दिवसीय ;१८ ते २२ जानेवारी २०२६ध्द नेतृत्व विकास शिबिराचा काल समारोप झाला. या शिबिराच्या समारोपप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



समारोप भाषणात डॉ. शिंदे यांनी, युवकांवरील जबाबदा-या, समाजघडणीत युवक नेतृत्वाची भूमिका तसेच आदर्श युवक नेत्यांचे गुणधर्म यावर सखोल मार्गदर्शन केले. नेतृत्व म्हणजे केवळ पद नसून समाजाप्रती असलेली जबाबदारी, मूल्यनिष्ठा आणि निर्णयक्षमता असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी बहाई अकॅडमीचे संचालक लेसन आझादी यांनी मूल्याधिष्ठित नेतृत्वाची आवश्यकता विषद केली. यावेळी अमेरिकेतील अर्थशास्त्राचे प्राध्यापक जेम्स वेस्ट यांनी आंतरराष्ट्रीय एकात्मतेच्या गरजेविषयी सांगितले.

विद्यार्थी विकास संचालक डॉ. टी. एम. चौगुले यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. नेत्त्व विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले. शिबिराच्या कालावधीत नेत्त्व कौशल्य, व्यक्तिमत्व विकास, सामाजिक बांधिलकी आणि मूल्याधिष्ठित नेतृत्त्व यावर विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले.

शिबिरात एकूण ७० विद्यार्थी सहभागी झाले. सहभागी विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून नेतृत्त्वविषयक नवे दृष्टिकोन मिळाल्याची भावना व्यक्त केली. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे सुरेखा आडके आणि विजय इंगवले, बहाई अकॅडमीचे पराग, प्रीती, मारूती कांबळे, चव्हाण, अल्पेश उपस्थित होते.

25 JAN 2026

सकाळ,

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुणवत्तापूर्ण पायाभूत सुविधांची आवश्यकता

## डॉ. व्ही. बी. ककडे : शहाजी महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर, ता. २४ : ''विकसित भारतासाठी शिक्षण, संशोधनासह सर्व क्षेत्रांत गुणवत्ता पूर्ण पायाभूत सुविधांची गरज आहे,'' असे अर्थशास्त्राचे अभ्यासक डॉ. व्ही. बी. ककडे यांनी केले.

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात भूगोल विभागातर्फे 'भारतातील पायाभूत सुविधा आणि संसाधने : समस्या, आव्हाने व दृष्टिकोन' यावर एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा झाली. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. भारतातील पायाभूत सुविधा, संसाधने, विकास यावर संशोधकांनी लिहिलेल्या संशोधन पेपरचे प्रकाशन झाले.

डॉ. ककडे म्हणाले, ''गुंतवणुकीसाठी भारतात उत्तम सुविधा द्यावी लागतील. शिक्षणाचा दर्जा मात्र चिंतनीय आहे. रस्ते, लोहमार्ग, विमान क्षेत्र वेगाने विकसित होत आहे, मात्र शिक्षण संशोधनाकडे दुर्लक्ष होत आहे. मंदिरांसाठी मोठा



कोल्हापूर : श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील परिषदेत बोलताना डॉ. व्ही. बी. ककडे.

खर्च होताना दिसतो आहे, पण शिक्षण संस्था, शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी मोठा निधी मिळत नाही. विकसित भारतासाठी गुणवत्ता पूर्ण पायाभूत सुविधांची गरज आहे. अन्यथा हा विकास एकांगी ठरेल. चीनमधील १७ विद्यापीठे जागतिक क्रमवारीत पहिल्या हजारात आहेत, तर भारतातील एकही विद्यापीठ जागतिक क्रमवारीत दिसत नाही.''

पटियाला पंजाब येथील पंजाबी युनिव्हर्सिटीचे डॉ. दीपक कुमार म्हणाले, ''विकास मानव केंद्रित असावा. सामान्य माणूस दुर्लक्षित राहता कामा नये. मानव संसाधनाचा विकास, लोकांना रोजगार मिळायला हवा.'' गोवा येथील गव्हर्मेंट कॉलेजमधील डॉ. रथ यांनी भारतात सुरू असलेल्या पायाभूत विकासाबाबत माहिती दिली. भूगोल विभागप्रमुख डॉ. डी. एल. काशीद-पाटील यांनी स्वागत केले. प्रा. ऐश्वर्या हिंगमिरे, डॉ. सारिका कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. निता काशीद-पाटील, प्रा. शुभम पाटील, प्रा. गौरव काटकर, प्रा. प्रतिमा शिंदे यांनी संयोजन केले.

डॉ. ए. आर. चौगुले, शिवाजी विद्यापीठातील भूगोल आणि भूगर्भशास्त्र विभाग अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. एस. जाधव यांच्या उपस्थित समारोप झाला. महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा येथील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अधीक्षक मनीष भोसले, डॉ. आर. डी. मांडणीकर, डॉ. दीपककुमार वळवी, डॉ. के. एम. देसाई, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. शिवाजी ग्रंथालयातर्फे भूगोल विभागातील संदर्भ ग्रंथाचे ग्रंथ प्रदर्शन झाले. ग्रंथपाल डॉ. पांडुरंग पाटील, शोभा साळोखे, मंजिरी भोसले, अपर्णा गावडे यांनी संयोजन केले. पायाभूत विकास या संकल्पनेवर आधारित भिंतीपत्रकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते केले.

2 5 JAN 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘नॅक न्यू मॅट्रिक्स’द्वारे नवा दृष्टिकोन

## डॉ. नीलेश पवार : पेठवडगावला यादव महाविद्यालयात कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा

पेठवडगाव, ता. २४ : ''नॅक सध्या नव्या मॅट्रिक्सच्या विविध निकषांवर कार्यरत असून, या प्रक्रियेत सातत्याने सुधारणा केल्या जात आहेत. येणाऱ्या काळात नॅकचे अंतिम मॅट्रिक्स व्यापक, सर्वसमावेशक आणि गुणवत्ता-केंद्रित असतील,'' असे प्रतिपादन न्यू कॉलेज, कोल्हापूरचे नॅक समन्वयक डॉ. नीलेश पवार यांनी केले.

श्री विजयसिंह यादव महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या परीस स्पर्श योजना अंतर्गत येथे 'नॅक न्यू मॅट्रिक्स' विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली.

डॉ. नीलेश पवार म्हणाले, ''नॅक नवीन मॅट्रिक्सद्वारे गुणवत्ता, नियोजन आणि पारदर्शकतेवर अधिक भर देत असून, सध्या या निकषांमध्ये सुधारणा सुरू आहेत. अंतिम मॅट्रिक्स अधिक सर्वसमावेशक असतील आणि त्यासाठी संस्थात्मक पातळीवर सातत्यपूर्ण सुधारणा करणे आवश्यक आहे.'' अध्यापन अधिक परिणामकारक करणे, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाची भूमिका यावरही त्यांनी भर दिला.



पेठवडगाव : यादव महाविद्यालयात 'नॅक न्यू मॅट्रिक्स' विषयावर एकदिवसीय कार्यशाळेत बोलताना डॉ. नीलेश पवार. व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.

दुसऱ्या सत्रात कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा येथील संशोधन व विकास विभागाचे डीन डॉ. सर्फराज मुजावर यांनी नॅक प्रक्रियेत संशोधन व विकासाचे स्थान स्पष्ट केले. संशोधन प्रकल्प, शोधनिबंध, नवकल्पना आणि त्यांचा नॅक गुणांकनावर होणारा परिणाम त्यांनी सोप्या शब्दांत मांडला. तिसऱ्या सत्रात यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेसचे उपप्राचार्य डॉ. जयकुमार चव्हाण यांनी नवीन एमबीजीएल मानांकन पद्धतीतील इनपुट, प्रक्रिया आणि परिणाम मॅट्रिक्स यांची माहिती दिली. माहिती संकलन, पुरावे सादर करणे आणि दैनंदिन कामकाजात मॅट्रिक्सचा प्रभावी वापर कसा करावा, यावर त्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थान प्र. प्राचार्य डॉ. अशोक चव्हाण यांनी भूषविले. डॉ. अमर पोवार यांनी प्रास्ताविक केली. तर डॉ. सचिन पवार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यशाळेसाठी डॉ. दिनेश भंडारी, डॉ. अर्जुन कोकरे, प्रा. अविनाश लाडगावकर, प्रा. साहिल मुजावर, डॉ. प्रशांत यादव, प्रा. प्रशांत गायकवाड, प्रा. नाझिम शेख आणि डॉ. रेणुका पवार यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

2 5 JAN 2026

पुण्यनगरी

# पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे यश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मधील पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धा सरदार पटेल विद्यापीठ, गुजरात येथे दि. २० व २१ जानेवारी या कालावधीत पार पडल्या. या स्पर्धेमधील ६ संशोधन शाखांसाठी शिवाजी विद्यापीठामार्फत २३ जणांचा संघ सहभागी झाला होता. या संघाने स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले.

विद्यापीठ संघामधील इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी या शाखेतून शुभम गिरीगोसावी, तेजस यादव, नीलेश सूर्यवंशी व स्वप्नाली मगदूम यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला.

या विद्यार्थ्यांसोबत संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. एम. पी. भिलावे, डॉ. कविता वड्राळे, प्रा. प्रणाली टाकले आदी उपस्थित होते. या अन्वेषण संशोधन स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या संघास प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. टी. एम. चौगले, डॉ. पी. के. पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

25 JAN 2026
लोकमत

# अन्वेषण संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे प्रावीण्य

कोल्हापूर : गुजरात येथील सरदार पटेल विद्यापीठात पार पडलेल्या पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने प्रावीण्य मिळवले. गुजरात येथे दि. २० आणि २१ जानेवारी या कालावधीत पार पडलेल्या या स्पर्धेत सहा संशोधन शाखेसाठी शिवाजी विद्यापीठामार्फत २३ जणाचा संघ सहभागी झाला होता. या संघामधील इंजिनिअरिंग आणि तंत्रज्ञान शाखेतून शुभम गिरीगोसावी, तेजस यादव, नीलेश सूर्यवंशी आणि स्वप्नाली मगदूम यांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. त्यांच्यासोबत संघ व्यवस्थापक प्राणीशास्त्र विभागाचे डॉ. एम.पी. भिलावे, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे डॉ. कविता वड्राळे, भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ फार्मसीचे प्रा. प्रणाली टाकले सहभागी झाले होते.

2 5 JAN 2026

लोकमत

# तंत्रज्ञान हीच विद्यार्थी-शिक्षकांची आजची लेखणी : मनीषकुमार गुप्ता

## शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : आधुनिक काळात तंत्रज्ञानाशिवाय तरणोपाय नाही. यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षण क्षेत्रात आणखी आमूलाग्र बदल घडविणे गरजेचे आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षकांची तंत्रज्ञान हीच आजची लेखणी असून, त्याचा वापर काळजीपूर्वक करावा, असे मत 'सी-डॅक'चे शास्त्रज्ञ मनीषकुमार गुप्ता यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागात मंगळवारी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. ओडिशा येथील सेंच्युरियन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी अँण्ड मॅनेजमेंटच्या डॉ. प्रज्ञा पाणी प्रमुख पाहुण्या होत्या.

डॉ. पाणी म्हणाल्या, अध्यापन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या प्रकारे करू शकतो. पाँडेचरी विद्यापीठाचे डॉ. सी. जयशंकर बाबू यांनी भाषा विकासात तंत्रज्ञानाच्या उपयोगाची माहिती सांगितली. डॉ. संतोष कोळेकर, डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. प्रतीक्षा ठुंबरे आदी उपस्थित होते.

विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. राणी नलवडे, डॉ. प्रकाश मुंज यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. सुषमा चौगले, डॉ. गीता दोडमणी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अक्षय भोसले, डॉ. अनिल मकर यांनी आभार मानले.

2 5 JAN 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात राजर्षी शाहू संगीत रजनीचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात दि. २९ व ३० जानेवारी रोजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे राजर्षी शाहू संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले आहे. ही दोनदिवसीय संगीत रजनी संध्याकाळी ५.३० वाजता राम गणेश गडकरी सभागृह, पेटाळा येथे होणार आहे. संगीत रजनीचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते होणार असून, या प्रसंगी शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.



संगीत रजनीमध्ये पहिल्या सत्रामध्ये मौशमी जाजू, पुणे यांचे कथ्थक नृत्य होणार आहे, तर दुसऱ्या सत्रामध्ये गांधार देशपांडे, मुंबई यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमामध्ये पहिल्या सत्रात डॉ. सुधांशू कुलकर्णी व सारंग कुलकर्णी, बेळगाव यांच्या हार्मोनियम (संवादिनी) वादनाची जुगलबंदी होणार आहे, तर या दिवशीच्या दुसऱ्या सत्रामध्ये पं. विजय कोपरकर, पुणे यांच्या शास्त्रीय गायनाने राजर्षी शाहू संगीत रजनीची सांगता होणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमांना आशय कुलकर्णी (तबला), शुभम खंडाळकर (गायन), ज्ञानेश्वर अंडील (पखवाज आणि पढंत), यशवंत थिटे (हार्मोनियम), प्रदीप कुलकर्णी (तबला), गिरीधर कुलकर्णी (तबला), महेश देसाई (तबला), सारंग कुलकर्णी (हार्मोनियम) व स्वरुप दिवाण (हार्मोनियम) यांची साथसंगत लाभणार आहे.

2 5 JAN 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माणूस होणे ही कवी होण्याची पूर्व अट

## अजय कांडर; विद्यापीठातील 'कविकट्टा' झाला काव्यमय!




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित काव्यसंमेलनास उपस्थित कवी.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कवी भोवतालाचे दुःख, मानवी वेदना किती तीव्रतेने मांडतो यावर त्या कवितेचे मूल्य ठरते. तर त्यासाठी आधी कवी होण्याची पूर्व अट म्हणजे माणूस होणे, असे प्रतिपादन कवी अजय कांडर यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ आणि शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग व बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित काव्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते. प्रमुख उपस्थितीत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, चित्रकार संजय शेलार होते.

अजय कांडर म्हणाले, वर्तमानाला भिडण्याची ताकद आणि स्वतःला चार पावले अधिक पुढे नेण्याची गोष्ट कवितेमुळे साध्य होते. यासाठी झब्बा, दाढी, शबनम, जाकीट अशा बाह्य उपचारांची काहीही गरज नसते. किंबहुना कवी हे मिरवण्याचे साधन नाही.

कोणत्याही कलेचा इतिहास पाहता तो अस्वस्थतेला प्राधान्य देणारा आहे. माणूस प्रगती व भौतिक सुविधांनी शिखरावर जरी गेला तरी अंतिमतः माणूस म्हणूनच शाश्वतता उरते. त्यासाठी आधी भूमीचा तुकडा त्याच्या पायाशी असावा लागतो. यावेळी त्यांनी वर्तमानावर भाष्य करणारी 'दगड कोण भिरकावतो' ही सामाजिक जाणिवेची कविता सादर केली.

प्रा. चंद्रकांत पोतदार यांच्या बहारदार सूत्रसंचालनाने हे काव्यसंमेलन रंगले. यावेळी शरयू आसोलकर (सावंतवाडी), इंद्रजित घुले (मंगळवेढा), चंद्रकांत बाबर (आरग), कविता ननवरे (कोल्हापूर), विष्णू पावले (पावलेवाडी, बत्तीस शिराळा) व मंदार पाटील (पन्हाळा) या कवींनी आपल्या कविता सादर केल्या. मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, चित्रकार संजय शेलार यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रारंभीचे सूत्रसंचालन ज्योती वराळे यांनी केले. आभार विश्वकोश मंडळाच्या संपादकीय सहायक डॉ. सुस्मिता खुटाळे यांनी मानले. यावेळी डॉ. धनंजय सुतार, डॉ. युवराज जाधव, कवी बबलू वडर, मतीन शेख, सोनाली जाधव, कवयित्री पूनम सावंत यांच्यासह काव्यरसिक उपस्थित होते.

25 JAN 2026

लोकमत

# 'कविकट्टा' झाला काव्यमय !

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ आणि शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत यांच्यातर्फे आयोजित काव्यसंमेलनामुळे विद्यापीठातील 'कविकट्टा' काव्यमय झाला. अजय कांडर अध्यक्ष होते.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, चित्रकार संजय शेलार उपस्थित होते. अजय कांडर यांनी 'दगड कोण भिरकावतो' ही सामाजिक जाणिवेची कविता सादर केली. प्रा. चंद्रकांत पोतदार यांच्या सूत्रसंचालनाने हे काव्यसंमेलन रंगले.

यावेळी शरयू आसोलकर (सावंतवाडी), इंद्रजीत घुले (मंगळवेढा), चंद्रकांत बाबर (आरग), कविता ननवरे (कोल्हापूर), विष्णू पावले (बत्तीस शिराळा) आणि मंदार पाटील (पन्हाळा) यांनी कविता सादर केल्या. मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. ज्योती वराळे यांनी सूत्रसंचालन केले. विश्वकोश मंडळाच्या संपादकीय सहायक डॉ. सुस्मिता खुटाळे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. धनंजय सुतार, डॉ. युवराज जाधव, बबलू वडर, मतीन शेख, सोनाली जाधव, पूनम सावंत उपस्थित होते.

25 JAN 2026

लोकमत

# लोकशाहीच्या विस्तारात जी. डी. बापूंचे स्मरण आवश्यक : खोरे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** साम्राज्यवादास पर्यायी व्यवस्था म्हणून उभी राहिलेली साताराची प्रतिसरकार चळवळ ही आदर्श राजनीतीचे प्रतीक होते. फिल्डमार्शल जी. डी. बापू लाड यातील एक प्रमुख होते. आजच्या लोकशाहीच्या व्यापक विस्तारात जी. डी. बापूंचे स्मरण आवश्यक आहे, असे मत ज्येष्ठ संपादक अरुण खोरे यांनी मंगळवारी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील 'क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड अध्यासन' आयोजित 'प्रतिसरकारची चळवळ आणि जी. डी. बापू लाड' या विषयावर ते बोलत होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते. खोरे म्हणाले, भूमिगत चळवळ ही सामान्य माणसांचा आवाज होती. लोकशाहीचा विचार केंद्रस्थानी ठेवून ती राबविली जात होती. या चळवळीमागे तत्कालीन महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास आणि संसदीय लोकशाहीचा संदर्भ आहे. संघटनात्मक कार्याचे प्रारूप म्हणून याकडे नव्या अभ्यासकांनी पाहायला हवे, किंबहुना प्रतिसरकार चळवळीचे दस्तावेजीकरण होणे गरजेचे आहे.

कुलसचिव शिंदे म्हणाले, सामान्यांतला सामान्य दोन घास सुखाने खावा, या हेतूने प्रतिसरकारची चळवळ उभी राहिली. बापूंनी मराठवाडा मुक्ती संग्रामातही महत्त्वाचे योगदान दिले. मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. भक्ती नाईक यांनी सूत्रसंचालन केले. विष्णू पावले यांनी आभार मानले. यावेळी प्रा. नंदकुमार मोरे, प्राचार्य आर. एस. डुबल, डॉ. नवनाथ गुंड, प्रा. भारती पाटील, प्रा. अवनीश पाटील उपस्थित होते.